**फेमा १९९९ - चालू खाते व्यवहार - आयसीसी चा विदेशात वापर**
**एपी (डीआयआर सिरीज) परिपत्रक क्र. ७३ (जानेवारी, २४, २००४)**

**भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी मुद्रा नियमन विभाग**
**केंद्रीय कार्यालय, मुंबई ४०००01**

जानेवारी २४, २००३

एपी (डीआयआर सिरीज) परिपत्रक क्र. ७३

प्रति,
विदेशी चलनाचे सर्व अधिकृत विक्रेते

प्रिय महोदया / महोदय,

**फेमा १९९९ – चालू खाते व्यवहार : आयसीसी चा विदेशात वापर**

अधिकृत विक्रेत्यांचे लक्ष भारत सरकार अधिसूचना क्र. जीएसआर ३८/ दिनांक ३ मे २००० सूचना पत्र क्र. एस.ओ. ३०१ (ई) दिनांक ३० मार्च २००१ च्या बदलासह, वेधण्यात येत आहे – त्या द्वारे विशिष्ट चालू खात्यावरील व्यवहारांवर मज्जाव व काहींवर निर्बंध आणण्यात आले आहेत.

२. भारत सरकारने यानंतर सूचनापत्र क्र. जीएसआर. ३३ (ई) दिनांक १५ जानेवारी २००३ (प्रत सोबत दिली आहे) सूचनापत्र क्र. ३८ (ई) दिनांक ३ मे २००० मध्ये बदल करण्यासाठी जारी केली आहे. अधिकृत विक्रेत्यांना कळविले जाते की इफएम -फेमा (सध्याचे लेखा व्यवहार नियम) २००० च्या नियम ५ मधील निर्बंध भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्व परवानगी आयसीसीच्या निवासी व्यक्तीं कडून होणाऱ्या वापरावर लागू होणार नाहीत. हे खर्च त्यांनी विदेशातील त्यांच्या प्रवासात परंतु आयसीसी च्या पत मर्यादेच्या आत केलेले असावेत. त्याउप्पर जरी, भारतीय रिझर्व्ह बँकेने वित्तीय / वस्तूच्या मर्यादेवर बंधन घातले नसले तरी निर्बंधित व निषिद्ध वस्तूंवर / सेवां वरील उदा. लॉटरी तिकिटे, निर्बंधित पुस्तके, स्वीप स्टेक मध्ये सहभाग, कॉलबॅक सेवा ई. निर्बंध लागू आहेत.

३. या परिपत्रकातील माहिती अधिकृत विक्रेत्यांनी संबंधित खातेदारांना द्यावी.

४, या परिपत्रकातील निर्देश फेमा १९९९ (१९९९चा ४२) च्या कलम १०(४) व कलम ११(१) अन्वये दिले आहेत.

आपला विश्वासू
**ग्रेस कोशी**
**मुख्य महाव्यवस्थापक**

भारत सरकारचे राजपत्र
अतिविशेष

भाग ११, कलम ३, उपकलम (१)
प्राधिकरणाद्वारे प्रकाशित
नवी दिल्ली, गुरुवार, जानेवारी १६, २००३, पौष २६, १९२४

क्रमांक २३, अर्थ व कंपनी व्यवहार मंत्रालय
(अथविषयक व्यवहार विभाग)

**अधिसूचना**

नवी दिल्ली अधिसूचना १५ जानेवारी २००३

जीएसआर ३३ (ई) जीएसआर ३३ (ई)

फेमा १९९९ (१९९९चा ४२) च्या कलम ५ व कलम ४६ च्या उपकलम (१) आणि उपकलम २ च्या कलम (ए) अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन व रिझर्व्ह बँकेच्या सहमतीनुसार, जनहितासाठी आवश्यक असल्याने भारत सरकार फेमा (प्रचलित लेखा व्यवहार) नियम २००० मध्ये खालील बदल करीत आहे.

१) **संक्षिप्त शीर्षक व सुरुवात**

(१) या नियमांना फेमा (प्रचलित लेखा व्यवहार) सुधारित नियम २००३ म्हटले जाईल.

२) ते भारत सरकारच्या राजपत्रात जाहीर झाल्यापासून लागू होतील.

२. फेमा (प्रचलित लेखा व्यवहार) नियम, २००० मध्ये नियम ६ नंतर खालील नियम अंतर्भूत केला जाईल :

**“(७) विदेशात असतांना आंतरराष्ट्रीय पत पत्राचा वापर-**

कलम ५ मधील कुठलेही निर्बंध आयसीसीच्या माध्यमातून केलेल्या विदेशातील प्रवासातील खर्चास लागू होणार नाहीत. ‘‘

**तळटीपः** मुख्य नियम सरकारी राजपत्रात जीएसआर ३८/ दिनांक २ मे २०००/अन्वये, भाग २, कलम ३, उपकलम १ मध्ये प्रकाशित करण्यात आले व नंतर एस ओ ३०१ (ई) दिनांक ३० मार्च २००१ अन्वये बलण्यात आले.

(एफ. क्र.१/५/ई सी/२०००, व्हॉल्यूम २)

संजीव मिश्रा, संयुक्त चिटणीस